# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 06/12/2019 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर मौजा मचले ले–आउट एमआयडीसी बोरी, कळमेश्वर येथे दिनांक 01/12/2019 चे 08:30 वा. ते दिनांक 04/12/2019 चे 21:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेन्द्र छोटेलाल शाहु, वय 30 वर्ष, रा. मौजा मचले ले–आउट एमआयडीसी बोरी, कळमेश्वर हे परिवारासह घराला कुलूप लावून मुलताई(म.प्र.) येथे गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने घराचा मागील दार तोडुन घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 45,500/–रू. व भारत गॅस कंपनीचे खाली सिलेंडर कि. 700/–रू. व नगदी 3,000/–रू. असा एकुण कि. 49,200/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि बावचे 8551969100 हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर गोंडेगाव वस्तीचे जवळ इंदर खदान झंडा चौक येथे दिनांक 05/12/2019 चे 15:00 वा. ते 16:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ओमप्रकाश रामचंद्र पाल, वय 45 वर्ष, रा. टेकाडी कॉलनी हे स्टाफ सह गोडेगाव बस स्टाप परिसरात पेट्रोलिंग करीत होते. इंदर खदान डंम्पींग यार्डच्या बाजुला चोरीचा कोळसा जमा करून आरोपीतांनी ठेवलेला आहे अशी गुप्त माहिती फिर्यादींना मिळाली. यावरून फिर्यादी पो.स्टे स्टाफसह त्या ठिकणी गेले असता त्यांना दोन आरोपीतांने पाहुन पळ काढला. घटनास्थळी 22 टन 110 किलो कोळसा किमती 66,000/–रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने वेकोली येथे जमा करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा वरखडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोलः– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर बसस्टाप काटोल येथे दिनांक 05/12/2019 चे 17:20 वा. ते 17:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अश्विनी सचिन किटे, वय 32 वर्ष, रा. साई नगर, वार्ड क्र. 1, वर्धा यांनी वर्धा वरून काटोला बसनी प्रवास केला. काटोल बस आगारने त्या बस मधून उतरल्यानंतर त्यांनी हॅन्ड पर्स चेक केली असता हॅन्डपर्स मधील सोन्याचे मंगळसूत्र 36 ग्रॅम कि. 72,000/–रू. सॅमसंग कंपनीचा मोबाईल कि. 1,000/–रू. व नगदी 1,000/–रू. असा एकुण 74,000/–रू. चा मुद्येमाल अज्ञात आरोपीने बस मधून उतरतांनी गर्दीचा फायदा घेत चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कुहीः– दि. 05/12/2019 चे 10:00 वा. ते 17:00 वा. चे सुमारास 43 वर्षीय पीडित/फिर्यादी या घरी हजर असतांना आरोपी नामे– प्रशांत अन्ना वासनिक, वय 40 वर्ष, रा. मांढळ, ता. कुही, जि. नागपूर याने पीडितेच्या घराच्या जिन्हयाचे दरवाज्यातुन घरात प्रवेश केले. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. पीडिता ओरडली असता आरोपीने तेथून पळ काढला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 451, 354(अ)(1)भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रमोद राऊत हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर